23 NOV

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# परदेशी विद्यार्थ्यांची विद्यापीठाला पसंती

## यंदा संख्या दुप्पट : श्रीलंका, सिरीयासह १२ देशांतील विद्यार्थी

संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २२ : पदवी, पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी परदेशी विद्यार्थ्यांचा शिवाजी विद्यापीठाकडील कल वाढला आहे. यावर्षी श्रीलंका, बांग्लादेश, सिरीयासह विविध १२ देशांमधील एकूण २८ विद्यार्थ्यांनी विद्यापीठात प्रवेश घेतला आहे. इंटरनॅशनल अफेअर्स सेलच्या प्रयत्नांमुळे गेल्यावर्षीच्या तुलनेत ही संख्या दुप्पट झाली आहे. त्याने विद्यापीठाची आंतरराष्ट्रीय पातळीवरील ओळख आणखी ठळक बनली आहे.

जगभरातील विविध देशांमधील विद्यापीठांसमवेत शिवाजी विद्यापीठाचे शिक्षण, संशोधनात परस्पर सहकार्य वाढावे याउद्देशाने याठिकाणी सन २०१६ मध्ये इंटरनॅशनल अफेअर्स सेलची स्थापना केली. याअंतर्गत परदेशांमधील विद्यार्थी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी येथे प्रवेशित होऊ लागले. सुरुवातीला त्यांची संख्या अगदी कमी होती. गेल्यावर्षी १५ विद्यार्थी प्रवेशित झाले होते. यंदा विविध देशांमध्ये आपल्या देशाच्या राजदूतांच्या माध्यमातून विद्यापीठाने आपल्या अभ्यासक्रमांची माहिती पोहोचविली. त्याचा चांगला परिणाम होऊन श्रीलंका, मॉरिशस, सिरीया, नेपाळ, बांगलादेश, पेरू, टांझानिया, दक्षिण आफ्रिका, तुवालु, फिजी, मलावी, लेसोथो या देशांतील एकूण २८ विद्यार्थी पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम, पीएचडीसाठी प्रवेशित झाले आहेत. त्यात १८ मुली, तर १० मुले आहेत. यापैकी पदवी अभ्यासक्रमासाठी १८, पदव्युत्तर ७, तर पीएचडीचे ३ विद्यार्थी आहेत. भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेच्या (आयसीसीआर) माध्यमातून या विद्यार्थ्यांना प्रवेश, वसतिगृह शुल्क, दैनंदिन व प्रवास खर्चासाठी फेलोशिप मिळते. त्यांच्यासाठी स्वतंत्र वसतिगृहाची व्यवस्था केली आहे. परदेशी विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट झाल्याने आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाची कक्षा २१ देशांपर्यंत रुंदावली आहे. या देशांतील विद्यापीठांसमवेत संयुक्त पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रम राबविण्यासह संशोधनासाठी परस्पर सहकार्य वाढविले जाणार आहे.



कोल्हापूर : श्रीलंका, बांग्लादेश, सिरीयासह विविध १२ देशांमधील एकूण २८ विद्यार्थ्यांनी यंदा शिवाजी विद्यापीठात प्रवेश घेतला आहे.




### या अभ्यासक्रमांना विद्यार्थी प्रवेशित

- पर्यावरणशास्त्र, हिंदी, पर्यावरण, संगीत, एम. ए. मास कम्युनिकेशन, बायोकेमिस्ट्री, वाणिज्य व व्यवस्थापन, एम. कॉम., बी. टेक कॉम्प्युटर सायन्स, मानसशास्त्र, सामाजिकशास्त्र, बी. ए. इंग्लिश, बीबीए या अभ्यासक्रमांना यंदा परदेशी विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. विद्यापीठातील अधिविभाग, राजाराम महाविद्यालय, विवेकानंद कॉलेज, महावीर महाविद्यालय, डीकेटीई इचलकरंजी, आरआयटी साखराळे, एसजीएम कराड महाविद्यालयातून ते शिक्षण घेत आहेत.

> जगभरातील विविध देशांमध्ये आपल्या देशाच्या राजदूतांच्या माध्यमातून अधिक चांगल्या पद्धतीने शिवाजी विद्यापीठातील अभ्यासक्रमांची माहिती पोहोचविण्यात आली. त्याचा सकारात्मक परिणाम होऊन यावर्षी प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या दुप्पट झाली आहे. सध्या विद्यापीठात विविध २१ देशांतील एकूण ६६ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांची संख्या आणखी वाढविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.
>
> **-डॉ. एस. बी. सादळे,**
> संचालक,
> इंटरनॅशनल अफेअर्स सेल

### 'एनआयआरएफ' रँकिंगला मदत होणार

- नॅशनल इन्स्टिट्यूशनल रँकिंग फ्रेमवर्क (एनआयआरएफ) मध्ये परदेशी विद्यार्थ्यांचा प्रवेश या निकषांमध्ये विद्यापीठाला कमी गुण मिळत होते. आता या विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने रँकिंगमध्ये त्याची मदत होणार आहे.

Scanned with CamScanner

23 NOV 2023 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# देशभरातील गडकोटांच्या दर्शनाने सारेच भारावले

## शिवशक्ती प्रतिष्ठान आयोजित छायाचित्र प्रदर्शनास प्रतिसाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

भारताच्या प्राचीन, मध्ययुगीन आणि अधुनिक कालखंडाच्या इतिहासाचे साक्षीदार असणाऱ्या देशभरातील गडकोट-किल्ल्यांच्या दर्शनाने साऱ्याचे भारावले. शिवशक्ती प्रतिष्ठान आयोजित 'भारतातील गडकिल्ले' छायाचित्र प्रदर्शनास कोल्हापूरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

दरम्यान, दीपावली सुट्टीमुळे देशभरातून आलेल्या पर्यटकांनीही या प्रदर्शनाचा आवर्जून लाभ घेतला. प्रदर्शन दि. २५ नोव्हेंबरपर्यंत सर्वांसाठी खुले असून याचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रदर्शनाच्या निमित्ताने ज्येष्ठ दुर्गप्रेमी बळवंत सांगळे यांचा गौरव करण्यात आला. तसेच दिवाळी सणानिमित्त गडकिल्ल्यांच्या प्रतिकृती उभारणाऱ्या १३ मंडळांचा विशेष सन्मानही करण्यात आला. प्रदर्शनात दुर्गप्रेमी बळवंत सांगळे यांनी कॅमेराबद्ध केलेल्या देशभरातील गडकोटांची बोलकी छायाचित्रे मांडण्यात आली आहेत.



**कोल्हापूर : शिवशक्ती प्रतिष्ठान आयोजित देशभरातील गडकोटांच्या प्रदर्शन पाहाताना शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. सोबत दुर्गप्रेमी बळवंत सांगळे, प्रतिष्ठानचे अध्यक्ष साताप्पा कडव व इतर.**

यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, इंद्रजित सावंत, हेमंत साळोखे, पंडित कंदले यांची प्रमुख उपस्थिती होती. संयोजन प्रतिष्ठानचे अध्यक्ष साताप्पा कडव, उपाध्यक्ष योगेश रोकडे, सचिव अमोल पोवार, प्रतीक जगताप, नीलेश पिसाळ, प्रफुल्ल भालेकर व सहकाऱ्यांनी केले.

Scanned with CamScanner

23 NOV 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेळाडूंनी खेळाकडे करिअर म्हणून पहावे : डॉ. डी. टी. शिर्के

कोल्हापूर, ता. २२ : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय मैदानी स्पर्धा न्यू कॉलेज मैदानावर झाल्या. उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते व संस्थेचे माजी चेअरमन के. जी. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या वेळी डॉ. शिर्के यांनी खेळाडूंनी खेळाकडे करिअर म्हणून पहावे. खेळातील स्पर्धेमुळे आयुष्याच्या स्पर्धेत टाकण्याचे धाडस निर्माण होत असल्याचे सांगितले. डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड, प्रा. आर. व्ही. शेटगे उपस्थित होते.

स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद शिवराज महाविद्यालयाने, न्यू कॉलेजने द्वितीय, पुरुष विभागाची चॅम्पियनशिप नाईट कॉलेजने तर महिला विभागात विवेकानंद कॉलेजने विजेतेपद पटकावले. स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पुरुष खेळाडू म्हणून प्रतीक पाटील व महिला खेळाडू म्हणून प्राजक्ता शिंदे यांना गौरवण्यात आले. प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले.स्वागत प्रा. अमर सासने यांनी केले. प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. आभार उपप्राचार्य डॉ. आर. डी. धमकले यांनी मानले.




कोल्हापूर : आंतरविभागीय मैदानी स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी अन्य मान्यवर.

Scanned with CamScanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2023

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात शनिवारपासून राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामार्फत शनिवार, दि. २५ व २६ नोव्हेंबर या कालावधीत 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन फिजिक्स ऑफ मटेरिअल्स अँड मटेरिअल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन २०२३' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे.

परिषदेचे उद्घाटन भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात दि. २५ रोजी सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. या परिषदेमध्ये मार्गदर्शन करण्याकरिता सेंटर फॉर मटेरिअल्स फॉर इलेक्ट्रॉनिक्स (सिमेट, पुणे), येथील माजी संचालक डॉ. डी. पी. अंमळनेकर, डॉ. एम. व्ही. कुलकर्णी तसेच भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (पुणे) येथील डॉ. मुहंमद मुस्तफा यांना निमंत्रित करण्यात आले आहे.



परिषदेमध्ये कॅटलिसिस, नॅनोमटेरिअल्स, सोलर सेल, सुपरकॅपॅसिटर, बॅटरी, बायोफिजिक्स, स्पेस ॲप्लिकेशन्स इत्यादी विषयांवर चर्चासत्र आयोजित करण्यात आलेले आहे. तसेच भारत सरकारच्या स्टार्टअप इंडिया या योजनेला अनुसरून तरुणांमधील उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी या परिषदेअंतर्गत 'इनोवेशन, आंत्रप्रिन्युअरशिप अँड एक्झिबिशन' या विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले आहे. या परिषदेसाठी २०० संशोधकांनी नोंदणी केली आहे.

या परिषदेमार्फत देशातील तरुण संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ व उद्योजकांना एकत्र येण्याची तसेच आपल्या संशोधन कार्याची देवाणघेवाण करण्याची संधी प्राप्त होणार आहे.

Scanned with CamScanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2023

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात २५ पासून राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागामार्फत दि. २५ व २६ नोव्हेंबर या कालावधीत 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन फिजिक्स ऑफ मटेरिअल्स अँड मटेरिअल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले आहे. परिषदेचे उद्घाटन भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांची प्रमुख उपस्थिती असेल. ही माहिती भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. केशव राजपुरे, संयोजक डॉ. नीलेश तरवाळ यांनी दिली. यावेळी सिमेट, पुणे येथील माजी संचालक डॉ. डी. पी. अंमळनेकर, डॉ. एम. व्ही. कुलकर्णी तसेच भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्था (पुणे) येथील डॉ. मुहंमद मुस्तफा यांना निमंत्रित केले आहे. या परिषदेमध्ये कॅटलिसिस, नॅनोमटेरिअल्स, सोलर सेल, सुपरकॅपॅसिटर, बॅटरी, बायोफिजिक्स, स्पेस ॲप्लिकेशन्स इत्यादी विषयांवर चर्चासत्र आयोजित केले आहे. भारत सरकारच्या 'स्टार्टअप इंडिया' या योजनेला अनुसरून तरुणांमधील उद्योगजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी या परिषदेअंतर्गत 'इनोव्हेशन, आंत्रप्रिन्युअरशिप अँड एक्झिबिशन' या विशेष सत्राचे आयोजन केले आहे.

Scanned with CamScanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2023
सकाळ

# भौतिकशास्त्र अधिविभागात शनिवारपासून राष्ट्रीय परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागातर्फे शनिवारी (ता. २५) आणि रविवारी (ता. २६) 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन फिजिक्स ऑफ मटेरिअल्स अँड मटेरिअल्स बेस्ड डिव्हाईस फॅब्रिकेशन' या विषयावरील राष्ट्रीय परिषद होणार आहे. या परिषदेचे उद्‍घाटन भौतिकशास्त्र अधिविभागाच्या सभागृहात शनिवारी सकाळी १० वाजता कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. या परिषदेत सेंटर फॉर मटेरिअल्स फॉर इलेक्ट्रॉनिक्सचे (सिमेट, पुणे) माजी संचालक डॉ. डी. पी. अंमळनेकर आणि डॉ. एम. व्ही. कुलकर्णी, भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे डॉ. मुहमंद मुस्तफा मार्गदर्शन करणार आहेत. कॅटलिसिस, नॅनोमटेरिअल्स, सोलर सेल, सुपरकॅपॅसिटर, बॅटरी, बायोफिजिक्स, स्पेस ॲप्लिकेशन्स आदी विषयांवर चर्चासत्र आणि इनोवेशन, आंत्रप्रिन्युअरशिप अँड एक्झिबिशन विशेष सत्र होणार असल्याची माहिती भौतिकशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. केशव राजपुरे, संयोजक डॉ. नीलेश तरवाळ यांनी दिली.

Scanned with CamScanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2023
पुढारी

# 'यसबा' करंडकचा लोगो अनावरण

**कोल्हापूर :** दिग्दर्शक यशवंत भालकर यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त आंतरशालेय कला महोत्सव यसबा करंडक २०२३ आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थी विकास विभाग, शिवाजी विद्यापीठ आणि चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धा विद्यापीठात होणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू दिगंबर शिर्के यांच्या हस्ते या लोगोचे अनावरण झाले. याप्रसंगी विद्यार्थी विकास विभाग संचालक पी. टी. गायकवाड, परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ.अजितसिंह जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ.आलोक जत्राटकर, फाऊंडेशनचे अध्यक्ष संदीप भालकर, सपना जाधव-भालकर उपस्थित होते. संग्राम यशवंत भालकर यांनी संपूर्ण करंडकचे नियोजनाविषयी माहिती दिली. येत्या डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात हा महोत्सव होणार असल्याचे सांगितले.

Scanned with CamScanner

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
23 NOV 2023
तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षेतील ७३ विषयांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत पदवी व पदव्युत्तरच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी ५ हजार ६३७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. या परीक्षेत भरारी पथकाकडून सांगलीत ४, साताऱ्यात ५ असे दोन जिल्ह्यातून ५ कॉपीचे प्रकार उघडकीस आले. भरारी पथकाकडून नोंदीत दोषी विद्यार्थ्यांवर परीक्षा प्रमाद समितीमार्फत कारवाई करण्यात येणार आहे. तसेच विद्यापीठ परीक्षांचे आत्तापर्यंत ७३ विषयांचे निकाल जाहीर करण्यात आले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा पुढील परीक्षेचा मार्ग मोकळा झाला आहे. विद्यार्थ्यांनी नियमांचे पालन करून परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

Scanned with CamScanner